SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, Phone No. 0231-2609296/9139
www.unishivaji.ac.in, Email ID : , pgbutr3@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र
दूरध्वनी –ईपीएबीएक्स -२६०९०००, फोन नं. ०२३१-२६०९२९६/९१३९,
www.unishivaji.ac.in, : pgbutr3@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र.: एसयु./पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रक्रिया २४ / 5324 दिनांक : 07 DEC 2024

## परिपत्रक

**दि. २७, व दि. २८ मार्च, २०२४ च्या युजीसी अधिसूचनेनंतर नेट परीक्षा पात्र असलेल्या पण सन २०२४—२५ या शैक्षणिक वर्षामध्ये Ph.D. PET प्रवेश परीक्षा दिलेल्या व प्रवेश परीक्षा न दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी अधिविभागातील प्रवेश प्रक्रियेवेळी करावयाच्या कार्यपध्दतीबाबत..**

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक २७ व दि. २८ मार्च, २०२४ च्या युजीसी अधिसूचनेनंतरच्या नेट परीक्षेतून जे विद्यार्थी नेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना पीएच.डी. (PET) प्रवेश परीक्षेतून सूट दिली जाईल अशी तरतूद आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांकडून पीएच.डी. (PET) प्रवेश परीक्षेतून सुट मिळण्यासाठी विंनती पत्र व इमेल विभागास प्राप्त झाले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२४—२५ च्या पीएच.डी. (PET) प्रवेश परीक्षेसाठी दि. ०५ ऑक्टोबर, २०२४ ते दि. २८ ऑक्टोंबर, २०२४ या कालावधीमध्ये ऑनलाईन प्रवेश अर्ज भरून घेण्यात आले आहेत. सदर मुदतीमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रवेश अर्ज भरले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे नेट परीक्षेचे गुण (NET Score) ग्राहय धरण्यात येतील याची संबंधितांनी नोद घ्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी पीएच.डी. (PET) प्रवेश परीक्षेचा अर्ज भरलेला आहे. परंतु प्रवेश परीक्षा दिलेली नाही अशा विद्यार्थ्यांना संगणक प्रणालीमध्ये NET Score भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. सबब संबंधित विद्यार्थ्यांनी NET Score विद्यापीठाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधून भरण्याची कार्यवाही त्वरीत पुर्ण करून घेण्यात यावी याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच जे विद्यार्थी युजीसीच्या अधिसूचनेनंतर नेट परीक्षा देवून पीएच.डी. साठी पात्र झाले आहेत परंतु त्या विद्यार्थ्यांनी पीएच.डी. (PET) प्रवेश परीक्षा दिलेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. साठी नेट परीक्षेचा स्कोर ग्रहीत धरावा किंवा पीएच.डी. प्रवेश परीक्षेचे गुण ग्रहीत धरावेत याबाबत संबंधित विद्यार्थ्यांकडून समक्ष मुलाखतीवेळी लेखी स्वरूपात हमीपत्र भरून घेण्यात यावे. त्याचप्रमाणे सदर बाब मुलाखतीवेळी संशोधन सल्लागार समितीच्या निदर्शनास आणावी.

आपला विश्वासू

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : मा. अधिविभागप्रमुख तथा अध्यक्ष, संशोधन सल्लागार समिती,
सर्व संबंधित अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर